# प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा ताणतणाव आणि समायोजन क्षमता यांच्यातील संबंधाचा अभ्यास

**रविंद्र भाईदास पाटील**
जिल्हा परिषद कन्या शाळा,
प्रकाशा, तालुका - शहादा, जिल्हा नंदुरबार

**सारांश :** प्रस्तुत संशोधनात प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा ताणतणाव आणि समायोजन क्षमता यांच्यातील संबंधाचा अभ्यास केला असून याविषयी सद्यस्थिती जाणून घ्यावयाची म्हणून सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला आहे.१२० प्राथमिक शाळांमधील शिक्षकांची न्यादर्श म्हणून निवड केली आहे. माहितीचे विश्लेषण व अन्वयार्थ लावण्यासाठी r मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणाचा अवलंब केला आहे.
निष्कर्ष :- प्राथमिक शाळांमधील शिक्षकांच्या ताणतणाव आणि समायोजन क्षमता यांच्यात ऋण सहसंबंध असून तो घनिष्ठ स्वरुपाचा आहे.

**प्रास्ताविक :**

डॉ.कोठारी यांच्या मतानुसार "शिक्षणाची पुनःरचना करुन इप्सित ध्येय साध्य करण्यासाठी शिक्षण प्रक्रियेतील अत्यंत महत्वाचा घटक म्हणजे शिक्षक.अशा या महत्त्वपूर्ण शिक्षकांच्या कार्याला डॉ. राधाकृष्णन म्हणतात की, "देशाच्या प्रगतीमध्ये आणि विकासामध्ये शिक्षक महत्त्वाची भूमिका बजावत असतो नवी पिढी आपल्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये करण्यास किती सक्षम होते हे शिक्षकावरच अवलंबुन असते आणि जर शिक्षक आपली जबाबदारी उत्तमप्रकारे सांभाळण्यास सज्ज असतील तर त्यांना अधिकाधिक कार्य करण्यासाठी, त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी उत्तम जीवन जगण्याची हमी सरकारने दिली पाहिजे". (पंडित, मोरे व पठाण, २००६. पृ.११)आजच्या आधुनिक काळातील शिक्षक आणि शिक्षकी व्यवसाय ह्या जरी अतिशय महत्त्वपूर्ण बाबी असतील तरी शिक्षकांच्या व्यवसाय विविध घटकांचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या प्रभाव पडत असतो.जसे समायोजन,शालेय व्यवस्थापन आणि सर्वात महत्त्वाचे प्रभाव पाडणारे घटक म्हणजे ताणतणाव हे होय.

ताणतणाव प्रत्येक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीत आढळून येतो. शिक्षकी व्यवसाय देखील त्याला अपवाद नाही. या व्यवसायात शैक्षणिक, अशैक्षणिक कामे, वरिष्ठाकंडून येणारा दबाव, पालकांच्या वाढलेल्या अपेक्षा, विद्यार्थ्यांचे वर्तन, सहकाऱ्यांशी असलेले विरोधी किंवा चांगले संबंध अशा अनेक अडचणीमुळे समस्येमुळे शिक्षकांला व्यावसायिक ताणतणाव जाणवत आहे.अशा वेळी ताण निर्माण झाल्यावर शिक्षक समायोजित होतो का ? ताणतणाव कमी होण्यासाठी व

अडचणींवर मात करण्याकरिता समायोजन आवश्यक आहे का ? ताणतणाव व समायोजन यांच्यात सहसंबंध असातो काय ? या सर्व प्रश्नांच्या अभ्यासासाठी प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आले आहे.

**समस्या विधान :-**

प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा ताणतणाव आणि समायोजन क्षमता यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. जि.प. प्राथमिक प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा ताणतणाव आणि समायोजन क्षमता यांच्यातील सहसंबंधचा अभ्यास करणे
२. खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांमधील ताणतणाव व समायोजन यांच्यातील सहसंबंधचा अभ्यास करणे

**शुन्य परिकल्पना :-**

१) जि.प. प्राथमिक प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा ताणतणाव आणि समायोजन क्षमता यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.
२) खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांमधील ताणतणाव व समायोजन क्षमता यांच्यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.

**पद्धती :**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा समायोजनाचे मापन करण्यासाठी डॉ. प्रमोद कुमार (वल्लभ विद्यानगर) यांची समायोजन शोधिकेचा व ताणतणाव मापन करण्यासाठी संशोधकाने स्वनिर्मित ताणतणाव प्रश्नावलीचा अवलंब करण्यात आला.

**जनसंख्या व न्यादर्श:** प्रस्तुत संशोधनात प्राथमिक शाळांमधील १२० शिक्षकांची सहेतुक नमुना निवड पध्दतीने न्यादर्श म्हणून निवड केली होती.

**संख्याशास्त्रीय परिमाणे:** प्रस्तुत संशोधनात संकलित केलेल्या माहितीचा अन्वयार्थ लावण्यासाठी r मूल्य काढण्यात आले.

**माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा ताणतणाव आणि समायोजन क्षमता यांच्यातील सहसंबंधचा अभ्यास करण्यासाठी उद्दिष्टानूसार संशोधनात मांडण्यात आलेल्या परिकल्पना तपासून पाहिल्यात.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.3 ISSN No. 2456-1665

**परिकल्पना क्रं. ०१** जि.प. प्राथमिक प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा ताणतणाव आणि समायोजन क्षमता यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.

कोष्टक क्र. १

| चल | N | प्राप्त 'r' | नमुन T 'r' | (df) | प्राप्त 'r' व नमुना 'r' तुलना | 'r'ची सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|
| **ताणतणाव**<br>**समायोजन** | ६० | -०.७० | .२१ | ५८ | - ०. ७०> ०.२१ | सार्थक |

**निरीक्षण :-**

वरील कोष्टकावरून, जि.प. प्राथमिक प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा ताणतणाव व समायोजन क्षमता यातील प्राप्त 'r' चे मूल्य -.७० आहे. स्वाधीनता मात्रा (df) ५८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर संख्याशास्त्रीय टेबल नूसार 'r' चे नमुना मूल्य ०.२१ आहे.

**अर्थनिर्वचन**

प्राप्त 'r' चे मूल्य -०.७० असून ते नमुना 'r' मूल्यापेक्षा अधिक आहे. ०.०५ सार्थकता स्तरावर प्राप्त 'r' मूल्य अधिक असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल व संशोधन परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. परंतु प्राप्त 'r' मूल्य -०.७० आहे. यावरून असे दिसून येते की, जि.प. प्राथमिक प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा ताणतणाव व समायोजन क्षमता यांत ऋण सहसंबंध आढळून येतो.

**निष्कर्ष**

जि.प. प्राथमिक प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा ताणतणाव व समायोजन क्षमता यांत ऋण सहसंबंध आढळून येतो. यावरून असे दिसून येते की, ताणतणाव जास्त असेल तर समायोजन क्षमता कमी असते. ताणतणाव कमी असेल तर समायोजन अधिक असते.

**परिकल्पना क्रं. ०२** खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा ताणतणाव आणि समायोजन क्षमता यांच्यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.

कोष्टक क्र.२ २

| चल | N | प्राप्त 'r' | नमुना 'r' | (df) | प्राप्त 'r' व नमुना 'r' तुलना | 'r'ची सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|
| **ताणतणाव**<br>**समायोजन** | ६० | -०.७० | .२१ | ५८ | - ०. ७०> ०.२१ | सार्थक |

**निरीक्षण :-**

वरील कोष्टकावरून, खाजगी अनुदानित प्राथमिक प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा ताणतणाव व समायोजन क्षमता यातील प्राप्त 'r' चे मूल्य -.७० आहे. स्वाधीनता मात्रा (df) ५८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर संख्याशास्त्रीय टेबल नूसार 'r' चे नमुना मूल्य ०.२१ आहे.

**अर्थनिर्वचन**

प्राप्त 'r' चे मूल्य -०.७० असून ते नमुना 'r' मूल्यापेक्षा अधिक आहे. ०.०५ सार्थकता स्तरावर प्राप्त 'r' मूल्य अधिक असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल व संशोधन परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. परंतु प्राप्त 'r' मूल्य -०.७० आहे. यावरून असे दिसून येते की, खाजगी अनुदानित प्राथमिक प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा ताणतणाव व समायोजन क्षमता यांत ऋण सहसंबंध आढळून येतो.

**निष्कर्ष**

खाजगी अनुदानित प्राथमिक प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा ताणतणाव व समायोजन क्षमता यांत ऋण सहसंबंध आढळून येतो. यावरून असे दिसून येते की, ताणतणाव जास्त असेल तर समायोजन क्षमता कमी असते. ताणतणाव कमी असेल तर समायोजन अधिक असते.

**निष्कर्ष :-**

१. जि.प. प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा ताणतणाव व समायोजन क्षमता यांत ऋण सहसंबंध असून तो घनिष्ठ स्वरुपाचा असतो.
२. खाजगी अनुदानित प्राथमिक प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा ताणतणाव व समायोजन क्षमता यांत ऋण सहसंबंध असून तो घनिष्ठ स्वरुपाचा असतो.
३.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. आगलावे, प्र. (२००७). *सामाजिक संशोधन पद्धती.* पूणेः पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन.
२. कदम, चा.प. (२००५). *शैक्षणिक संख्याशास्त्र* (प्रथम आवृत्ती). पुणेः नूतन प्रकाशन.
३. कक्कड व गायकवाड. (१९९५). *शिक्षण व अध्यापक शिक्षण. (प्रथम आवृत्ती.)* पूणेः नूतन प्रकाशन.
४. कुलकर्णी, डी. आर. (२००८). *प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र (प्रथम आवृत्ती).* नागपूरः विद्या प्रकाशन.
५. पंडीत, ब. बी. व मोरे, लता. (२०१०). *शिक्षणशास्त्र संशोधनात संख्याशास्त्रीय परीक्षिकांचा उपयोग* (प्रथम आवृत्ती). नागपूरः पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स.